# * आवाहन *

**विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जनजागृती कार्यक्रम करण्याबाबत...**

माहितीचा अधिकार कायद्याची अंमलबजावणी दि. १२ ऑक्टोबर २००५ पासून सुरु झाली. या कायद्या बाबत व्यापक जन जागृती व्हावी, शासन व्यवस्थेत माहितगार नागरिकांचा सहभाग वाढावा तसेच पारदर्शकता व उत्तरदायित्वाची प्रक्रिया सुरु व्हावी यासाठी केंद्र शासनाने विविध उपक्रम राबविलेले आहेत.

भारत सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभाग (DoPT) अनुदानीत सेंट्रल प्लॅन स्किम २०१६-१७ अंतर्गत माहितीचा अधिकार केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या विषयावर **जनजागृती कार्यक्रम** करणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुणे जिल्हयातील **मावळ, आंबेगाव, जुन्नर व वेल्हा** या तालुक्यात सर्वसामान्य नागरीकांसाठी **माहिती अधिकार अधिनियम, २००५ बाबत प्रत्येकी एक प्रमाणे कार्यशाळा** आयोजित करावयाच्या आहेत. सदरचा माहितीचा अधिकार जनजागरण कार्यक्रम **२० फेंब्रुवारी ते २८ फेब्रुवारी, २०१७** या कालावधीत आयोजीत करावयाचाआहे.

या प्रकल्पांतर्गत **पुणे जिल्हयातील** स्वयंसेवी संस्थांकडून सदर कार्यक्रम आयोजीत करणेसाठी अर्ज मागविणेत येत आहेत. **अर्ज करण्याची अंतीम मुदत ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून १० दिवस अथवा दि. ५ जानेवारी, २०१७ पर्यंत राहील.** यामध्ये **माहितीच्या अधिकार अधिनियम,२००५ या कायदयाच्या अनुषंगाने अनुभवी व्याख्यात्यांच्या मदतीने सर्व कार्यशाळा घेण्याची** जबाबदारी संस्थेवर सोपविण्यात येईल. सदर कार्यक्रम राबविण्यासाठी अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.

## अटी व शर्ती:-

- ✓ **स्वंयसेवी संस्था नोंदणीकृत असावी.**
- ✓ **संस्था नोंदणी प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे असावेत.**
- ✓ **मागील तीन वर्षाचे कार्यक्रम वार्षिक अहवाल व आर्थिक लेखे परिपुर्ण असावेत.**
- ✓ **मागील तीन वर्षाचे ऑडीट पुर्ण झालेले असणे व संस्थेचे कामकाज सर्वसाधारणपणे समाधानकारक असणे आवश्यक आहे.**
- ✓ **माहिती अधिकार अधिनियम,२००५ या अनुषंगीक जिल्हयात कार्यक्रम घेण्याचा पुर्व अनुभव असल्यास प्राधान्य**

- सदर कार्यशाळा घेण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्ज छाननी प्रक्रियेअंती निवड झालेल्या संस्थेस प्रती कार्यशाळा रु.१२,०००/- प्रमाणे निधी RTGS व्दारे अदा करण्यात येईल. त्याअंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा खर्च, व्याख्याते मानधन व प्रवासखर्च सहीत अपेक्षीत आहे.
- निवड करण्यात आलेल्या संस्थेस यशदासोबत सामजस्य करार (MOU) करणे बंधनकारक असेल.

**अधिक माहितीसाठी संपर्क :-**
**प्रकल्प अधिकारी,**
**माहिती अधिकार केंद्र,**
**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे**
**दुरध्वनी क्र. – ०२०- २५६०८१३०, मोबाईल क्र. ८४०८९८२७८६**
**rti@yashada.org or varsha.kanikdale@yashada.org**